मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अबब तब्बल ७ कोटींचा अश्व!

## ७ कोटींचा अश्व पाहण्यासाठी पशू प्रेमींची झुंबड..!

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** तब्बल ७ कोटी रुपये किमतीचा अश्व असे म्हटल्यास अविश्वसनीय वाटत असेल. पण, होय पिंपरी-चिंचवडमध्ये आयोजित देशातील सर्वात मोठ्या देशी गोवंश व अश्व पशू प्रदर्शनामध्ये सात कोटी रुपयांचा जातीवंत अश्व पहायला मिळाला. तो दिसतो कसा? हे पाहण्यासाठी अक्षरशः पशू प्रेमींची झुंबड उडाली आहे. अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या पुढाकाराने भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र येथे दि.२५ आणि दि. २६ नोव्हेंबर असे दोन दिवस भारतातील सर्वात मोठे देशी गोवंश व अश्व प्रदर्शन तसेच पशू आरोग्य शिबीर आयोजित केले आहे. या पशुप्रदर्शनामध्ये खिल्लार, देवणी, लालकंधारी, थारपारकर, म्हैस, रेडा, कांकरेंज, गीर, डांगी, साहिवाल, पुंगनूर, मालनाड गिड्डा, कपिला गाय बैल तसेच मारवाडी व भीमथडी अश्व मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे क्रमांक काढण्यात येणार आहेत. पहिल्या क्रमांकाच्या गोवंश आणि पशूंचे 'रॅम्प वॉक' होणार आहे, असा प्रयत्न भारतात प्रथमच होत आहे. मूळचा राजस्थानी असलेल्या या घोड्याचं नाव आहे फ्रेंजेड जी. हा मारवाडी प्रकारचा घोडा आहे. फ्रेंजेडचा खुराक जाणून तुम्हालाही धक्का बसेल. घोडा मालक युवराज जडेजाने सांगितले की, हा घोडा १५ लीटर दूध पितो. दररोज ५ किलो




हरभरा आणि ५ किलो डाळी खातो. आणि हो फक्त 'मिनरल वॉटर'च पितो. फ्रेंजेड हायब्रिड असल्याचे घोडा मालक सांगतात. फ्रेंजेडचे वडील राजस्थानी, तर आई रत्नागिरी प्रजातीची आहे. तो ४ वर्षांचा असून गेल्या दीड वर्षांपासून युवराजसोबत आहे. फ्रेंजेडने आतापर्यंत गुजरात, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. तसेच तब्बल ११०० हुन स्पर्धांमध्ये तो 'विजेता' ठरला आहे. आजपर्यंत एकाही घोड्याने त्याचा पराभव केलेला नाही. युवराज हे व्यवसायाने जमीनदार आणि आडतदार आहेत. ते गुजरातचे रहिवासी आहेत. फ्रेंजेडच्या देखभालीवर दरमहा अडीच ते तीन लाख रुपये खर्च होत असल्याचे त्यांनी सांगितले. घोड्याची काळजी घेण्यासाठी चारजण नेहमी सोबत राहतात. घोड्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी खास रुग्णवाहिकेसारखी गाडी असते. घोड्याच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी २४ तास एक डॉक्टरही तैनात असतो. या पशुप्रदर्शनामध्ये खिल्लार, देवणी, लालकंधारी, थारपारकर, म्हैस, रेडा, कांकरेंज, गीर, डांगी, साहिवाल, पुंगनूर, मालनाड गिड्डा, कपिला गाय बैल तसेच मारवाडी व भीमथडी अश्व मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे क्रमांक काढण्यात येणार आहेत. पहिल्या क्रमांकाच्या गोवंश आणि पशूंचे 'रॅम्प वॉक' होणार आहे, असा प्रयत्न भारतात प्रथमच होत आहे मूळचा राजस्थानी असलेल्या या घोड्याचं नाव आहे फ्रेंजेड जी. हा मारवाडी प्रकारचा घोडा आहे. फ्रेंजेडचा खुराक जाणून तुम्हालाही धक्का बसेल. घोडा मालक युवराज जडेजाने सांगितले की, हा घोडा १५ लीटर दूध पितो. दररोज ५ किलो हरभरा आणि ५ किलो डाळी खातो. आणि हो फक्त 'मिनरल वॉटर'च पितो. फ्रेंजेड हाइब्रिड असल्याचे घोडा मालक सांगतात. फ्रेंजेडचे वडील राजस्थानी, तर आई रत्नागिरी प्रजातीची आहे. तो ४ वर्षांचा असून गेल्या दीड वर्षांपासून युवराजसोबत आहे. फ्रेंजेडने आतापर्यंत गुजरात, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. तसेच तब्बल ११०० हून अधिक स्पर्धांमध्ये तो 'विजेता' ठरला आहे. आजपर्यंत एकाही घोड्याने त्याचा पराभव केलेला नाही.

# संविधान दिननिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे अभिवादन

## संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आझमभाई पानसरे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी (दि.२६) भारतीय संविधान दिननिमित्त पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष तुषार कामठे यांच्या नेतृत्वाखाली संविधान




प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. सामाजिक न्याय विभागाचे शहर अध्यक्ष मयूर जाधव यांच्या वतीने पानसरे यांच्या हस्ते संविधान पुस्तिकेचे आणि कामठे यांच्या हस्ते प्रास्ताविकेचे वाटप करण्यात आले. यावेळी माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत – धर, जेष्ठ नेते शिरीष जाधव, देवेंद्र तायडे, राजन नायर, ज्योती निंबाळकर, काशिनाथ जगताप, प्रशांत सपकाळ, भारत कुंभार, राजेंद्र कडू, सुहास देशमुख, के. डी. वाघमारे, बिरुदेव मोटे, कमलेश वाळके, रेखा मोरे, अनिल भोसले, सुगंधा जाधव, सुवर्णा वाळके, संगीता जाधव, सुदाम शिंदे, विनोद वाघमारे, विशाल क्षीरसागर, सुभाष गालफाडे आदी उपस्थित होते.राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आझमभाई पानसरे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी (दि.२६) भारतीय संविधान दिननिमित्त पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# चिंचवडगावात पीएमपी प्रवाशांची 'धावाधाव'

## चिंचवडगावात मंडईबाहेरील रस्त्यावरील बस उड्डाणपुलाखाली थांबतात



**पिंपरी । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** निगडीहून सुटणाऱ्या द्रूतगती मार्गे जाणाऱ्या बसेस चिंचवडगावातील पॉवर हाऊस चौक (मोरया हॉस्पिटल) येथे येत नाहीत. मंडईबाहेरील रस्त्यावरील बस उड्डाणपुलाखाली थांबतात. परिणामी पॉवर हाऊस चौक (मोरया हॉस्पिटल) येथून या मार्गे जाणाऱ्या प्रवाशांना मंडई बाहेरील रस्त्यावरील या 'अनधिकृत' थांब्यापर्यंत चालत यावे लागते. या थांब्यावर बसेस थांबण्यासाठी स्वतंत्र जागा नसल्याने बस रस्त्यावर उभ्या केल्या जातात. प्रवाशांना धावत-पळत बस पकडावी लागते.

शहरातील एकूण प्रवासी संख्येपैकी निम्म्याहून अधिक प्रवासी चिंचवडगावातील लिंक रस्त्यावरील पॉवर हाऊस (मोरया हॉस्पिटल) या मार्गावरुन प्रवास करतात. पण, शहरात 'पीएमपीएल'करिता महापालिकेकडून स्वतंत्र इमारत किंवा कार्यालय दिले नाही. त्यामुळे, 'पीएमपी'ने पॉवर हाऊस चौक (मोरया हॉस्पिटल) येथे व बिजलीनगर रस्त्यावर 'एसकेएफ' कंपनीच्या अलिकडे पदपथावर पत्र्याच्या 'मुव्हेबल' शेडमध्ये कंट्रोल केबिन थाटले आहे. प्रवासी निशिकांत देशपांडे म्हणाले,''शेडमध्ये प्रवासी मावत नाहीत. त्यामुळे, त्यांना पदपथावर थांबावे लागते. बसेस रस्त्यात थांबल्यामुळे रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होते. महिला, मुली, विद्यार्थी तसेच जेष्ठ नागरिकांचे खूप हाल होत आहेत.'' योगेश पाटील म्हणाले, ''डांगे चौक मार्गे येणाऱ्या बसेस पॉवर हाऊस चौक (मोरया हॉस्पिटल) चिंचवडगाव येथे शेवटच्या बस थांब्याला पूर्वीपासून येत होत्या. मात्र, सध्या गेल्या वर्षापासून बसचा शेवटचा थांबा आला सांगून या बस रस्त्यावर दलाल लॅमिनेट्स / कामत हॉस्पिटलसमोर उड्डाणपुलाखाली रस्त्यावर थांबवल्या जातात. डांगे चौक- वाल्हेकरवाडीकडून चिंचवडगावात तसेच खंडोबामाळाकडे जाणाऱ्या बसेस व खासगी वाहनांची संख्या खूप असते. या बसेस रस्त्यात थांबविल्यामुळे सर्व प्रवासी उतरेपर्यंत विनाकारण वाहतूक कोंडी होते. अनेक प्रवासी तेथेस रिक्षा अथवा भाडोत्री कार शोधतात.

छाया भालेराव म्हणाल्या, ''खंडोबामाळ रस्त्यावरील 'एसकेएफ' कंपनी अलिकडील थांब्यावर फक्त फेरी मारून आणण्यासाठी नेल्या जातात. प्रवाशांना रस्त्यावरील थांब्यावर उतरवून मोकळ्या बसची फेरी मारुन आणली जाते. उड्डाणपुलाखालून या बस थांब्याकडे जाणारा रस्ता अरुंद आहे. कंपन्यांच्या येणाऱ्या-जाणाऱ्या बसेस, पीएमपी बसेस व खासगी वाहने यामुळे हा रस्ता कायम कोंडीत असतो. या रस्त्यावर मुस्लीम दफनभूमी व मशीदही आहे. याशिवाय रस्त्यावर भंगारवाल्यांची दुकाने असल्यामुळे रस्त्याच्या एका बाजूला त्यांनी उतरविलेले भंगार पडलेले असते. वस्तुतः या स्थानकावर बस फक्त उतारु प्रवाशांपुरत्या थांबवल्यास रस्त्यावर बस थांबवायचा वेळ कमी लागेल. खंडोबामाळ रस्त्याला (एसकेएफ) कंपनी रस्त्यावर विनाकारण बस न नेता त्या पॉवर हाऊस चौक (मोरया हॉस्पिटल) चिंचवडगाव येथेच शेवटच्या थांब्याला थांबविल्यास वेळेत खूप बचत होईल. स्वप्नील देवस्थळी म्हणाले, ''चापेकर चौकात व पॉवर हाऊस चौक (मोरया हॉस्पिटल) चिंचवडगाव येथे रस्त्यांचे काम चालू होते. तेव्हा, तात्पुरती उपाय योजना म्हणून बसेस खंडोबामाळ (एसकेएफ कंपनी) रस्त्यावर येथून सोडण्यात येत होत्या. आता रस्ता होऊन वर्ष उलटून देखील येथूनच बसेस सुटतात.'' अविनाश डोंगे म्हणाले, उड्डाणपुलावरून होणारी वाहतूकही डांगे चौकाकडून सरळ चिंचवड स्थानकाकडे जाणाऱ्या वाहनांपुरती मर्यादित आहे. चापेकर चौक हा चिंचवड गावातील मुख्य चौक असून मंडई, पेठेकडे, चिंचवडगाव, बिजलीनगर व खंडोबामाळ, चिंचवड स्थानकाकडे, डांगे चौक मेगा हायवे -वाल्हेकरवाडीकडे जाणारी वाहतूक येथूनच होते. याच रस्त्यावर चैतन्य मल्टिस्पेशालिटी व अदित्य बिर्लाही दोन मोठी रुग्णालये तसेच अनेक छोटी-मोठी रुग्णालये असल्याने नेहमी रुग्णवाहिका या रस्त्यावरून जातात. अशातच येणाऱ्या-जाणाऱ्या बस रस्त्यावर थांबवून शेवटचा थांबा म्हणून प्रवाशांना रस्त्यावर उतरविणे कितपत योग्य आहे?

# पर्यावरण जागृतीसाठी पुणे ते कन्याकुमारी 'सायकल वारी'

## सायकलपटू जितीन इंगवले यांची विधायक मोहीम

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आपण प्रगती साधत असताना, आपल्याकडून कळत-नकळत निसर्गाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. प्रदूषणाची पातळी सातत्याने वाढत असताना, झाडांची कत्तल केली जाते. आगामी काळात स्वच्छ हवेचा प्रश्न गंभीर होणार आहे. पर्यावरणाचे संरक्षण करावे, याची जनजागृती करण्यासाठी सायकलपटू जितीन इंगवले यांनी 'पुणे ते कन्याकुमारी सायकल मोहिम' यशस्वी केली. पिंपरी-चिंचवडमधील सायकलपटू जितीन इंगवले व त्यांच्या ११ सहकाऱ्यांनी 'पर्यावरण' या संदर्भात जनजागृती व्हावी, या उद्देश्याने दि. १६ ते २५ नोव्हेंबर दरम्यान पुणे ते कन्याकुमारी या सायकल मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेमध्ये त्यांनी १५५० किमीचे अंतर त्यांनी या दहा दिवसात पूर्ण केले. एका दिवसात सुमारे दीडशे किमीचा टप्पा ते रोज पार करत होते. महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडू या राज्यातून त्यांनी प्रवास केला. पहाटे ५ वाजता ते सायकल



चालविण्यास सुरुवात करत असत. हा १५० किमीचा टप्पा गाठण्यासाठी रोज किमान १० ते ११ तास त्यांना सायकल चालवावी लागत असे. या मोहिमेत जितीन इंगवले यांच्यासह सुनील अडसूळ, संजय टिळेकर, चंद्रकांत ववले, संतोष दरेकर, संदीप बोडके, विनोद बोडके, गणेश गोरे, आशुतोष देसले, सुमीत पवार, रामदास दरेकर, अनिकेत इंगवले यांच्यासह वाहन सहाय्यक संतोष इंगवले सहभागी झाले होते. जितीन इंगवले म्हणाले की, या मोहिमेसाठी गेल्या अनेक महिन्यांपासून आम्ही सर्वजन दररोज किमान ३०-४० किमीचा तर आठवड्यातून एक दिवस १०० ते १२० किमी प्रवास करताना या मोहिमेचा सराव केला. यामुळेच ही अवघड मोहिम पूर्ण करण्यात आम्ही सर्वजन यशस्वी झालो आहोत.

> **"सायकलपटू जितीन इंगवले आणि त्यांच्या ११ सहकाऱ्यांनी पर्यावरणाच्या जनजागृतीसाठी एवढी मोठी मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली याबाबत त्यांचे मनापासून अभिनंदन. मनाचा निग्रह आणि सरावातील सातत्य या दोन गोष्टींच्या जोरावर एवढी मोठी मोहीम पूर्ण करण्यात या सर्वांना यश मिळाले आहे. या मोहिमेतून त्यांनी 'पर्यावरण वाचविण्याचा' संदेश देखील महत्वपूर्ण आहे.**
>
> **– शंकर जगताप,**
> **शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# अजित पवारांकडून विरोधकांचा समाचार!

## अमित शाहांना तक्रार करण्यासाठी भेटलो नसल्याचं दादांचं स्पष्टीकरण



**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा वाद सुरु असताना अचानक उपमुख्यमंत्री अजित पवार यांना डेंग्यूची लागण झाल्याची बातमी येऊन धडकली. त्यानंतर अजित पवार यांची वारंवार बदललेली कृती पाहता त्यांना राजकीय डेंग्यू तर झाला नाही ना या चर्चांनी जोर धरला.अजित पवारांचं आजारपण खरं की खोटं याची संपूर्ण राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाली. आज या चर्चांवर अजित पवारांनी पहिल्यांदाच आपल्या खास शैलीत उत्तर दिले आहे. 'मी लेचापेचा माणूस नाही. गेले १५ दिवस डेंग्यूमुळे आजारी होतो, राजकीय आजार माझ्या स्वभावात नाही. मी माझी मतं गेल ३२ वर्षे स्पष्टपणे मांडत असतो', असे म्हणत अजित पवारांनी विरोधकांच्या टीकेचा समाचार घेतला. तर अमित शाहांना तक्रार करण्यासाठी भेटलो नसल्याचं स्पष्टीकरण या वेळी अजित पवारांनी दिले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यातील सारथी संस्थेच्या कार्यालयाला भेट देऊन संस्थेच्या आवारात सुरु असलेल्या बांधकामाची पाहणी केली. त्यावेळी अजित पवार बोलत होते. यावेळी अजित पवारांनी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना काम लवकर करण्याच्या सूचना दिल्या. बांधकामासाठी निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन अजित पवार यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले. मराठा समाजाला वेगवेगळ्या योजनांचा लाभ व्हावा आणि मराठा समाजातील तरुणांना प्रशिक्षण मिळावे यासाठी सारथी संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. अजित पवार म्हणाले, माजी उपपंतप्रधान पहिले मुख्यमंत्री चव्हणांची आज पुण्यतिथी म्हणून त्यांना अभिवादन केलं. दिवाळीपूर्वी डेंग्यूमुळे १५ दिवस वाया गेले. राजकीय आजार माझ्या स्वभावात नाही. मी माझी मतं गेल ३२ वर्षे स्पष्टपणे मांडत आलो आहे. मध्यंतरी अमित शहांना भेटलो. तक्रार करण्यासाठी अमित शाहांना भेटल्याची माहिती खोटी आहे. तक्रार करणे माझ्या स्वभावात नाही. भाड्याच्या जागेत शासकीय ऑफिस नको आहेत.राज्यात अनेक बदल झाले आहेत. शासकीय इमारती चांगल्या असाव्यात त्या सरकारी जागेत असाव्यात. पुढची ५० वर्ष डोळ्यासमोर ठेवून चांगले आर्किटेक घेऊन,अधिकाऱ्यांशी बोलून इमारती बांधत आहेत. वेगात काम सुरू आहेत,निधी कमी पडू देणार नाही, कामाच्या बाबतीत गती मंदावू नये असा आमचा मानस आहे. कृषी भवन, कामगार भवन, शिक्षण भवन, सारथीची इमारत या सरकारी जागेत असाव्यात असा निश्चय केला होता. त्याची बहुतेक काम सुरु झालेली आहेत. अंतरवली सराटीतील अटकेबाबत मला माहिती नाही. त्याबाबत माहिती घेतो. आरक्षणाबाबतीत काम सुरू आहे. कोणीही भडकाऊ भाषण करू नये, सुसंस्कृत महाराष्ट्र कसा आहे हे यशवंतराव चव्हाण यांनी दाखवले आहे. सत्ताधारी असो विरोधक असो कोणीही असो त्यांनी भडकाऊ भाषण करू नये. वाचाळवीरांनी समाजामध्ये तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सध्या राज्यात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. लवकरच राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांची दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री याच्या उपस्थितीत पाण्याबाबत बैठक घेणार आहे. यासंदर्भात काही सूचना दिल्या आहेत. परत एकदा आढाव घेतला जाणार आहे. दुष्काळाबाबत उपाययोजना सुरू केल्या आहेत, असे अजित पवार म्हणाले.

# विमाननगरमधील नागरिक लढ्याच्या तयारीत

## मूलभूत सुविधा आणि हक्कांसाठी नागरिकांनी एकत्र येत लढा देण्याचा निर्णय

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पदपथांवरील अतिक्रमणे, झोपडपट्ट्यांचा वाढता विळखा, पदपथांची दुरवस्था, रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या पार्ट्या तसेच अपुरा आणि विस्कळीत पाणीपुरवठ्यासंदर्भात सातत्याने तक्रारी आणि त्या सोडविण्यासाठी पाठपुरावा करूनही महापालिका प्रशासन आणि पोलीस दाद देत नसल्याने आता विमाननगर येथील नागरिकांनी एकत्र येत लढा देण्याचा निर्णय घेतला आहे. संदीप सिंग, लेफ्टनंट कर्नल सरवटे, अनिता हनुमंते, पवन शर्मा, रीता घोष आणि मीनल देशमुख यांच्या नेतृत्वाखाली १०० हून अधिक नागरिक एकत्र आले असून मूलभूत सुविधांसाठी त्यांनी लढा देण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात विमाननगर परिसरातील कोणार्क पार्क येथे या नागरिकांनी बैठक घेतली. त्यामध्ये मूलभूत सुविधा आणि हक्कांसाठी अधिकाऱ्यांवर दबाव टाकण्याचा निर्धार करण्यात आला. परिसरातील समस्या सुटल्या नाहीत तर, आगामी निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णयही यावेळी जाहीर करण्यात आला. विमाननगर परिसरातील दुकानांची वाढती संख्या, पदपथांचा अभाव आणि दुरवस्था, पदथांवर झालेले विविध प्रकारची अतिक्रमणे, वाहतूक कोंडीच्या गर्तेत




अडकलेले प्रमुख रस्ते, चौक आणि उपरस्ते, विस्कळीत आणि अपुरा पाणीपुरवठा, वाढती गुन्हेगारी, रस्त्यावर जागोजागी आणि अस्ताव्यस्त पडलेला कचरा, प्लास्टिकची समस्यांबाबत या बैठकीत नागरिकांनी लक्ष वेधले. परिसरातील पंचतारांकित हॉटेल, पबमध्ये मध्यरात्री पर्यंत चालणाऱ्या पार्ट्या, त्यातून वाढलेली गुन्हेगारी, संगीत पार्ट्यांच्या नावाखाली होणारे ध्वनी प्रदूषण याचाही नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून त्यासंदर्भात तक्रारी करून त्याची दखल घेतली जात नसल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. या सर्व समस्या सोडविण्यासाठी पोलीस आणि महापालिका प्रशासनावर दबाव टाकावा लागेल. त्यासाठी एकत्र येत लढा देण्याची दिशा बैठकीत निश्चित करण्यात आली. प्रश्न कायम राहणार असतील तर आगामी निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा निर्धार यावेळी जाहीर करण्यात आला.यासंदर्भात विमाननगर परिसरातील कोणार्क पार्क येथे या नागरिकांनी बैठक घेतली. त्यामध्ये मूलभूत सुविधा आणि हक्कांसाठी अधिकाऱ्यांवर दबाव टाकण्याचा निर्धार करण्यात आला. परिसरातील समस्या सुटल्या नाहीत तर, आगामी निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णयही यावेळी जाहीर करण्यात आला. विमाननगर परिसरातील दुकानांची वाढती संख्या, पदपथांचा अभाव आणि दुरवस्था, पदथांवर झालेले विविध प्रकारची अतिक्रमणे, वाहतूक कोंडीच्या गर्तेत अडकलेले प्रमुख रस्ते, चौक आणि उपरस्ते, विस्कळीत आणि अपुरा पाणीपुरवठा, वाढती गुन्हेगारी, रस्त्यावर जागोजागी आणि अस्ताव्यस्त पडलेला कचरा, प्लास्टिकची समस्यांबाबत या बैठकीत नागरिकांनी लक्ष वेधले.

# रेल्वेच्या ब्लॉकमुळे प्रवांशाचे हाल!

## इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग आणि स्वयंचलित सिग्नलिंग प्रणालीचे काम सुरू

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे – लोणावळा रेल्वे मार्गावरील शिवाजीनगर ते खडकी स्थानकांदरम्यान इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग आणि स्वयंचलित सिग्नलिंग प्रणालीचे काम करण्यात आले. या कामासाठी दोन दिवस ब्लॉक घेण्यात आला. त्यामुळे रविवारी सलग दुसऱ्या दिवशी लोकल सेवेसह अनेक गाड्या रद्द झाल्याचा मोठा फटका प्रवाशांना बसला. रेल्वेच्या ब्लॉकमुळे शनिवारी (ता.२५) मुंबईहून सुटणाऱ्या काही गाड्या रद्द होत्या. पुणे- तळेगाव -लोणावळा -पुणे दरम्यान धावणाऱ्या सर्व ४६ लोकल गाड्या



रद्द होत्या. त्याचबरोबर अनेक गाड्या विलंबाने धावल्याने प्रवाशांचे हाल झाले होते. सलग दुसऱ्या दिवशी रविवारीही प्रवाशांना या ब्लॉकचा फटका बसला. आजही सर्व ४६ लोकल गाड्या रद्द राहिल्या. याचबरोबर पुण्याहून मुंबईला सुटणाऱ्या पुणे – मुंबई डेक्कन क्वीन एक्स्प्रेस, पुणे-मुंबई सिंहगड एक्सप्रेस, पुणे – मुंबई – पुणे डेक्कन एक्स्प्रेस, पुणे – मुंबई- पुणे इंटरसिटी एक्स्प्रेस, मुंबई – कोल्हापूर- मुंबई कोयना एक्सप्रेस या गाड्या रद्द राहिल्या. तसेच, पुणे- जयपूर एक्स्प्रेस, पुणे- मुंबई एक्स्प्रेस, पुणे- एनार्कुलम एक्स्प्रेस, दौंड-इंदोर एक्स्प्रेस या गाड्या सुमारे अर्धा तास ते चार तास विलंबाने धावल्या. याचबरोबर मुंबई-चेन्नई एक्स्प्रेस, काकीनाडा एक्स्प्रेस, मुंबई-भुवनेश्वर कोणार्क एक्स्प्रेस, मुंबई-हैदराबाद एक्स्प्रेस या गाड्याही उशिराने धावल्या. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. प्रवाशांना ऐनवेळी रेल्वेऐवजी इतर पर्यायांचा अवलंब करावा लागला. प्रवाशांना एसटी बसचा अथवा जादा पैसे मोजून कॅबचा वापर करावा लागला.

### ४६ लोकल गाड्या रद्द

» पुणे – लोणावळा रेल्वे मार्गावरील शिवाजीनगर ते खडकी स्थानकांदरम्यान इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग आणि स्वयंचलित सिग्नलिंग प्रणालीचे काम करण्यात आले. या कामासाठी दोन दिवस ब्लॉक घेण्यात आला. त्यामुळे रविवारी सलग दुसऱ्या दिवशी लोकल सेवेसह अनेक गाड्या रद्द झाल्याचा मोठा फटका प्रवाशांना बसला. रेल्वेच्या ब्लॉकमुळे शनिवारी (ता.२५) मुंबईहून सुटणाऱ्या काही गाड्या रद्द होत्या. पुणे– तळेगाव –लोणावळा –पुणे दरम्यान धावणाऱ्या सर्व ४६ लोकल गाड्या रद्द होत्या. त्याचबरोबर अनेक गाड्या विलंबाने धावल्याने प्रवाशांचे हाल झाले होते. सलग दुसऱ्या दिवशी रविवारीही प्रवाशांना या ब्लॉकचा फटका बसला. आजही सर्व ४६ लोकल गाड्या रद्द राहिल्या.

# दूध दरवाढीसाठी रस्त्यावर दूध ओतून रास्ता रोको

## इंदापुरातील शेतकऱ्यांनी पुणे- सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन केले

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

शासनाने दुधासाठी निश्चित केलेला हमी दर न देणाऱ्या सरकारी व खाजगी दूध प्रकल्पांवर कारवाई करावी, दुधाला प्रति लिटर ४० रुपये दर मिळावा. या व इतर मागण्यांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी आज इंदापुरातील शेतकऱ्यांनी पुणे- सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर दूध ओतून देत रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनात तरूण व सुशिक्षित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कांदलगाव येथील ओंकार सरडे



व सागर पेटकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. पोलीस निरीक्षक दिलीप पवार व मंडलाधिकारी सोपान हगारे यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारले. या संदर्भात पत्रकारांशी बोलताना सरडे व पेटकर यांनी सांगितले, की मागील कालावधीपासून दुधाचा दर सातत्याने घसरत चालला आहे. सध्या तो ३५ रुपयांवरुन अचानक कमी होवून २५ रुपयांवर आला आहे. त्यामुळे दूध उत्पादकांना मोठ्या अर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागत आहे. यंदाच्या वर्षी अत्यल्प पाऊस झाला आहे. शेतपीक येईल की नाही याची खात्री नाही. या आंदोलनाची दखल न घेतल्यास आगामी काळात अधिक तीव्र आंदोलन करण्याचा आमचा विचार आहे, असे ही त्यांनी स्पष्ट केले. दुधाला प्रति लिटर ४० रुपये दर मिळावा.जनावरांसाठी चारा डेपो तयार करावेत. शासनाकडून पेंड मिळावी. प्रत्येक गावात पशुवैद्यकीय दवाखाना सुरू करावा. गेल्या पाच वर्षातील भेसळ प्रतिबंधक कारवायांचा अहवाल सादर करावा. जनावरांसाठी विनाशुल्क विमा सुरक्षा कवच योजना सुरू करावी. दूध दर मूल्य आयोगाची स्थापना करावी, शासकीय हमीभावाप्रमाणे दर न देणाऱ्या सरकारी व खाजगी प्रकल्पांवर कारवाई करावी. अशा आमच्या मागण्या असून त्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र केले जाईल, असेही ओंकार सरडे यांनी स्पष्ट केले.





आमदार महेश लांडगे
वाढदिवस विशेषांक

न्यूज एक्सप्रेस मराठी

सोमवार, दि.२७ नोव्हेंबर २०२३

# पिंपरी-चिंचवडच्या आत्मसन्मानासाठी लढणारा ‘लोकनेता’

## आम्ही पिंपरी-चिंचवडकर, एकजुटीने राहणार, ‘स्मार्ट सिटी’ घडवणार.. !!

*अशी साद घालीत पिंपरी-चिंचवड शहराची ओळख आंतराष्ट्रीय स्तरावर उंचवण्याचा संकल्प घेवून काम करणारे आमदार महेश लांडगे यांनी आपल्या राजकीय वाटचालीत भूमिपुत्र, पिंपरी-चिंचवडकर आणि स्वीभामान व आत्मसन्माचे व्रत हाती घेतले आहे. कामगार नगरी, औद्योगिक नगरी, बेस्ट सिटी, स्मार्ट सिटी याहून पुढे पिंपरी-चिंचवडची ओळख स्पोर्ट्स सिटी, आयटी हब, एज्युकेशन हब आणि जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ म्हणून व्हावी, असा निर्धारही त्यांच्या कार्यपद्धतीत दिसतो.*

पिंपरी-चिंचवडमधील स्थानिक भूमिपूत्रांना न्याय मिळाला पाहीजे. शहराच्या विकासाचे निर्णय घेत असताना भूमिपूत्रांच्या भावनांचा विचार केला पाहिजे, असा आग्रह करीत पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या ‘पीएमआरडी’तील विलीनीकरण किंवा सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांच्या अर्धा गुंठा-एक गुंठा जमिनीवरील घरे अनधिकृत घरांवर कारवाई करु नये, अशी आक्रमक भूमिका घेताना दिसतात. त्यामुळे लांडगे यांच्या राजकीय वाटचालीचा केंद्रबिंदू कायम ‘पिंपरी-चिंचवडकर’ हाच राहिलेला पहायला मिळतो.



**सौ. शैलाताई मोळक,**
सरचिटणीस, भाजपा.

कोरोनारुपी अंधार दूर करण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या आमदार लांडगे यांनी पश्चिम महाराष्ट्रातील पूरग्रस्तांसाठी केलेले मदतकार्य, कोकणातील निसर्ग चक्रीवादळग्रस्त नागरिकांसाठी केलेली मदत, भारतातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत, महाराष्ट्रातील सर्वात मोठी ‘इंद्रायणी थडी’ जत्रा यासह सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात आपल्या कार्याची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आमदार लांडगे यांच्या लक्षवेधी समाजपयोगी आदर्शवत उपक्रम हाती घेतले.

### कोविड काळात एक हात मदतीचा :

कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मार्च २०२० मध्ये केंद्र व राज्य सरकारने लॉकडाउन सुरू केले. त्या काळात औद्योगिकनगरी पिंपरी-चिंचवडमधील सर्व उद्योग, कंपन्या, व्यावसायिक पेठा बंद झाल्या. गोरगरिब, कष्टकरी नागरिक ज्यांना रोज काम करुन पोट भरावे लागते, अशा लोकांची उपासमार सुरू झाली. त्यापार्श्वभूमीवर आमदार लांडगे यांनी ‘एक हात मदतीचा’ हा उपक्रम हाती घेतला. त्याद्वारे शहरातील सुमारे ७० हजार कुटुंबांना अन्नधान्य कीटचे वाटप केले. कोविड हेल्पडेस्क व प्लाझ्मा दान चळवळीच्या माध्यमातून अनेकांचे प्राण वाचण्यास मदत झाली. तसेचे बेड, ऑक्सिजन बेड, व्हेंटिलेटर, रेमडिसिव्हर इंजेक्शन याची कमतरता भासत असताना नागरिकांना दिलासा आणि माहिती देण्यासाठी परिवर्तन हेल्पलाईच्या सहकार्याने कोविड हेल्पडेक्स सुरू केला होता. त्याला अनेक नागरिकांना फायदा झाला. प्लाझ्मादान मोहीमुळे अनेकांना जीवदान मिळाले. यासह कोविडमुक्त पिंपरी-चिंचवडसाठी महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून कोविड टेस्टिंग मोहीम राबवण्यात आली. परिणामी, पिंपरी-चिंचवडचा मृत्यूदर राज्यात कमी राहिला. तसेच, रिकव्हरी रेटही सर्वाधिक होता.

### पश्चिम महाराष्ट्रातील पूरग्रस्तांना मदत: गो दान उपक्रम...

सांगली, कोल्हापूर परिसरातील प्रलयकारी पूरामुळे हजारो शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले. शेतातले पीक आणि गोठ्यातले पशुधन डोळ्यांदेखत उद्ध्वस्त झाले. अशा शेतकऱ्यांसाठी गो-दान उपक्रम आमदार लांडगे यांनी हाती घेतला. पूरग्रस्त नागरिकांनी लोकसहभागातून

(पान- ३ वर)








बलशाली महाराष्ट्राचे स्वप्न
पूर्ण करण्यासाठी
लढणारे उपमुख्यमंत्री
श्री. देवेंद्र फडणवीस यांचा
अष्टपैलू पैलवान..!
आमदार
महेशदादा
लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत
शुभेच्छा !
श्री. निलेश उध्दव बोराटे
- आपला माणूस


पिंपरी-चिंचवड
शहराच्या राजकारणातील,
वस्ताद..!
आमदार
महेशदादा
लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत
शुभेच्छा !
श्री. किसन बावकर बावकर


पिंपरी-चिंचवड
शहराच्या राजकारणातील,
वस्ताद..!
आमदार
महेशदादा
लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत
शुभेच्छा !
शांताराम कों. भालेकर (एस. के. बापू)


पिंपरी-चिंचवड
शहराच्या राजकारणातील,
वस्ताद..!
आमदार
महेशदादा
लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत
शुभेच्छा !
श्री. सचिनभाऊ श्रीधर तापकीर

# पिंपरी-चिंचवडच्या आत्मसन्मानासाठी लढणारा 'लोकनेता'

गो-दान देण्याचे आवाहन करण्यात आले. त्याला परिसरातील दानशूर लोकांनी मदत केली. त्यामुळे अनेक कुटुंबाना गो-धन मिळाले.

विशेष म्हणजे, राज्यातील २८८ आमदारांसमोर आदर्श निर्माण व्हावा, असे तब्बल २७ ट्रक अन्नधान्य लोकसहभागातून जमा करुन पश्चिम महाराष्ट्रातील पूरग्रस्त भागात वाटण्यात आले. एव्हढ्या मोठ्या प्रमाणात पूरग्रस्तांना मदत करणारे त्याकाळी आमदार लांडगे महाराष्ट्रात एकमेव ठरले आहेत.

## कोकणच्या मदतीसाठी पश्चिम महाराष्ट्राचा सुपूत्र धावला...

निसर्ग चक्रीवादळात कोकणवासीयांना मोठा फटका बसला. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक नुकसान झाले. त्यावेळी संकटग्रस्त नागरिकांना मदत करण्यासाठी आमदार लांडगे यांनी पुढाकार घेतला. जीवनावश्यक वस्तू घेवून कोकणात स्वत: लांडगे रवाना झाले. यासह स्थानिक नागरिकांना धीर देताना आमदार लांडगे यांना संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे. तसेच, शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा, असा संदेश जगाला देणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळगावी म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यातील आंबडवे या ठिकाणी असलेली शाळा निसर्ग चक्रीवादळाच्या तडाख्यात जमीनदोस्त झाली. दापोलीतील ग्रामीण भागात असलेल्या या शाळेची डागडूजी करण्यासाठी आता भाजपा आमदार तथा शहराध्यक्ष महेश लांडगे यांच्या साथीने पिंपरी-चिंचवड भाजपा कार्यकर्त्यांनी पुढाकार घेण्यात आला.

## शेती- माती आणि संस्कृतीसाठी कटिबद्ध असलेला नेता...

अवघ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या बैलगाडा शर्यतींवर बंदी घालण्यात आली होती. त्यानंतर सुमारे ११ वर्षे लोकचळवळ उभा करुन आणि न्यायालयीन लढा यशस्वी करीत आमदार लांडगे यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यती गतवर्षी सुरू झाल्या. त्यानंतर भारतातील सर्वांत मोठी बैलगाडा शर्यत भोसरी मतदार संघातील चिखली-जाधववाडी येथे भरवण्यात आली. संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरातील आणि विदेशातील बैलगाडाप्रेमींनी या शर्यतींच्या आयोजनाचे कौतूक केले.

## हिंदूभूषण छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक :

हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती, धर्मवीर संभाजी महाराज यांचा भारतातील सर्वात उंच आणि पूर्णाकृती पुतळा मोशी येथे उभारण्याचे काम सुरू आहे. स्वराज्याचे सरसेनापती हंबीरराव मोहीते यांचेही शिल्प साकारण्यात येणार आहे. संपूर्ण जगाला आपल्या राजाची महती कळावी. यासाठी शंभूसृष्टी विकसित करण्यात येत आहे. आमदार लांडगे यांच्या संकल्पनेतून तयार होणारे स्मारक शिव-शंभूप्रेमींसाठी 'स्फूर्तीस्थळ' निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते.




पिंपरी-चिंचवड
शहराच्या राजकारणातील,
वस्ताद..!
आमदार
महेशदादा
लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा !
पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन
श्री. निलेशभाऊ मधुकर नेवाळे
- सामाजिक कार्यकर्ते


पिंपरी-चिंचवड
शहराच्या राजकारणातील,
वस्ताद..!
आमदार
महेशदादा
लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा !
कु. सागरभाऊ थोरात


पिंपरी-चिंचवड
शहराच्या राजकारणातील,
वस्ताद..!
आमदार
महेशदादा
लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा !
पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन
श्री. सुनील तापकीर
- सामाजिक कार्यकर्ते


पिंपरी-चिंचवड
शहराच्या राजकारणातील,
वस्ताद..!
आमदार
महेशदादा
लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा !
पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन
सौ. नम्रताताई योगेश लोंढे






पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणातील,
वस्ताद..!
आमदार
महेशदादा लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा !
पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन
श्री. राजेंद्र किसनराव लांडगे


पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणातील,
वस्ताद..!
आमदार
महेशदादा लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा !
मा. श्री. निलेशदादा दिलीप भालेकर


प्रगतीशील
पिंपरी-चिंचवडचा
आश्वासक आणि
दूरदृष्टीचा नेता,
प्रखर राष्ट्राभिमानी,
गोरक्षक, बैलगाडा शर्यत
लढा यशस्वी करणारा
भूमिपुत्र..!
आमदार
महेशदादा लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा !
पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन
श्री. सुहास सोपान ताम्हाणे
- सामाजिक कार्यकर्ते


देव-देश अन्
धर्मासाठी वचनबद्ध
पंतप्रधान
श्री. नरेंद्रजी मोदी
यांचा लढवय्या
शिलेदार..!
आमदार
महेशदादा लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा !
पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन
श्री. गणेश मळेकर
- सामाजिक कार्यकर्ते



देव-देश अन् धर्मासाठी
वचनबद्ध पंतप्रधान
श्री. नरेंद्रजी मोदी
यांचा लढवय्या
शिलेदार..!
आमदार
महेशदादा
लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत
शुभेच्छा !
सौ. शितलताई धनंजय वर्णेकर
मा. श्री. धनंजय वर्णेकर



भारतीय राजकारणातील
आधुनिक 'चाणक्य' केंद्रीय
गृहमंत्री श्री. अमितभाई शाह
यांचा बहाद्दर राष्ट्राभिमानी..!
आमदार
महेशदादा
लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन
शुभेच्छुक
श्री. प्रतापमामा मोहिते
- सामाजिक कार्यकर्ते




भारतीय राजकारणातील
आधुनिक 'चाणक्य' केंद्रीय
गृहमंत्री श्री. अमितभाई शाह
यांचा बहाद्दर राष्ट्राभिमानी..!
आमदार
महेशदादा
लांडगे
आपणास दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन
शुभेच्छुक
सौ. साधनाताई मळेकर
- मा. नगरसेविका पिं. चिं. मनपा




मॅन ऑफ व्हिजन
भोसरी विधानसभेचे कार्यधुरंधर आमदार
27 NOV
पै. महेशदादा
लांडगे
अभिष्टचिंतन शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री अमोल अशोक पवार
डायरेक्टर-मंगलमूर्ती एंटरप्रायजेस




भोसरी विधानसभेचे लोकप्रिय
आमदार युवा हृदयसम्राट
पै. महेशदादा लांडगे
यांच्या वाढदिवसानिमित्त
मा.प्रा.राजेशभाऊ सस्ते युवा मंच आयोजित
भव्य संगीत
भजन स्पर्धा
पुरुष व महिला
10101/-
5101/-
3101/-
7101/-
4101/-
2101/-
1101/-
1101/-
1101/-
मंगळवार दि.28/11/2023 रोजी
सकाळी 9:00 वा.कार्यक्रम आयोजित
केला आहे तरी सर्वांनी उपस्थित रहावे
प्रा.राजेशभाऊ दत्तात्रय सस्ते
सौ.अर्चनाताई राजेश सस्ते

# आमदार महेश लांडगे यांचे विकासाचे व्हीजन

**भारताचे माजी राष्ट्रपती आणि 'मिसाईल मॅन' डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम यांच्या प्रेरणेतून 'भोसरी व्हीजन-2020' हे महत्त्वाकांक्षी अभियान आमदार महेश लांडगे यांनी हाती घेतले होते. यामध्ये उद्योग विकास, इन्फ्रास्ट्रक्चर, शिक्षण व आरोग्य, माहिती आणि तंत्रज्ञान विकास, तसेच क्रीडा क्षेत्राचा विकास या पाच प्रमुख बाबींचा समावेश आहे.**



श्री. निखिल काळकुटे
मा. अध्यक्ष, उद्योग आघाडी,भाजपा.

## काय आहे पंचसूत्रीची संकल्पना?

### १. औद्योगिक विकास :

भोसरी विधानसभा मतदार संघासह पिंपरी-चिंचवडमधील 'एमआयडीसी' आणि अन्य उद्योग-व्यावसायांना चालना देणे. औद्योगिक क्षेत्रातील समस्यांवर तोडगा काढून नवीन उद्योग- व्यावसायांसाठी पोषक वातावरण निर्माण करणे. त्याबाबत महापालिका, राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून नियोजनबद्ध कार्यक्रम आखणे.

### २. इन्फ्रास्ट्रक्चर :

मेट्रो आणि मोनो रेल, आंतरराष्ट्रीय विमानतळ, स्वतंत्र पोलीस आयुक्तालय, आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर, पुणे-नाशिक महामार्ग, रिंग रोड, न्यायालयासाठी अध्यायवत इमारत, संतपीठ, डिअर सफारी पार्क, बीआरटी रस्ते, कच-यापासून वीज निर्मिती, सांडपाणी पुर्वापर प्रकल्प, आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा मैदान, नेत्र रुग्णालय, वाहतूक नियोजन यासह अतिक्रमण, रेडझोन, बफर झोन यासह अन्य प्रश्न सोडविण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. यातील अनेक प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.

### ३. पर्यावरण संवर्धन :

'ग्रीन-भोसरी-क्लिन भोसरी' अभियान, नदी सुधार प्रकल्प, प्रदूषणमुक्त परिसर, वृक्षारोपण आणि जनत, नैसर्गिक जलस्त्रोतांचे संवर्धन, औद्योगिक प्रदूषणावर नियंत्रण, जनजागृती, नैसर्गिक प्रवाहांची स्वच्छता आणि संवर्धन यासाठी राज्य शासन आणि केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरू असून, महापालिका स्तरावरही कार्यवाही सुरू झाली आहे. 'रिव्हर सायक्लोथॉन' या उपक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. अविरत श्रमदान, सायकल प्रेमी यांसह विविध समाजिक संस्था, संघटना या कार्यात सहभागी झाल्या आहेत.

### ४. गुणवत्तापूर्ण शिक्षण :

भोसरीतील शासकीय व खासगी शैक्षणिक संस्थांच्या समस्या निकालात काढणे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी राज्य व केंद्र सरकारच्या सूचनांची अंमलबजावणी करणे. 'विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण' ही संकल्पना राबविणे. क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी कालबद्ध कार्यक्रमांची आखणी करणे. या अंतर्गत शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडिअम, आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुल, आंतरराष्ट्रीय दर्जाचे कबड्डी संकूल यासह स्केटिंग ग्राउंड, जलतरण तलाव असे महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रत्यक्षात पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. यासह जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ, संविधान भवन, डिअर सफारी पार्क, शहरातील सर्वांत मोठे रुग्णालय असे शहराच्या लौकीकात भर घालणारे प्रकल्प आमदार लांडगे यांनी हाती घेतले आहेत.

### ५. पायाभूत सुविधा :

पाणी पुरवठा सक्षमीकरण, आरोग्य सुविधा, सुरक्षा व्यवस्था सक्षम करणे. यासह प्रवासी वाहतूक व्यवस्थेचे नियोजन, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षमीकरण, वीज पुरवठा, व्यावसायिक व लघुउद्योजकांसाठी आवश्यक सुविधांची पूर्तता करण्याचा पाणी पुरवठ्याच्या बाबतीत पिंपरी-चिंचवडला 'आत्मनिर्भर' करण्याचा संकल्प केला आहे. त्याद्वारे आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पातून पिंपरी-चिंचवडला पाणी मिळवण्याचा प्रकल्प पूर्णत्वास आला असून, अवघ्या काही दिवसातच शहरवासींना पाणी उपलब्ध होणार आहे.






# आमदार महेश लांडगे
## वाढदिवस विशेषांक



मराठी न्यूज एक्सप्रेस
सोमवार, दि.२७ नोव्हेंबर २०२३

# रांगडा पैलवान ते कार्पोरेट आमदार!

*शेतकरी कुटुंबातील एक रांगडा पैलवान...राजकीय इच्छाशक्तीने नगरसेवक... स्थायी समिती सभापती होतो...लोकांच्या अपेक्षांना खरे उतरुन अपक्ष आमदार म्हणून निवडून येते... 'डिजिटल इंडिया'च्या जमान्यात लोकप्रतिनिधीही तितकेच कार्पोरेट व्हायला हवेत..लोकांच्या समस्या तात्काळ निकालात निघाव्यात म्हणून, कार्पोरेट जनसंपर्क कार्यालय हवे...लोकांच्या तक्रारी जाणून घेण्यासाठी सुशिक्षीत सहकारी हवे...आपल्या प्रत्येक कृतीतून जनसेवेचे दर्शन व्हावे, या हेतूने तांबड्या मातीत दंड थोपाटणार तरूण ते एक कार्पोरेट आमदार...असा लक्षवेधी प्रवास आहे... आमदार महेश लांडगे यांचा...*




### 'हायटेक' कार्यालय...
भोसरी मतदार संघातील तरुणाईच्या गळ्यातील ताईत आणि ज्येष्ठांचे "लाडके" बनलेले आमदार महेश लांडगे सध्या "हायटेक" होत आहेत. माजी आयपीएस अधिकारी, निवृत्त प्रशासकीय अधिका-यांचा समावेश असलेली "कॉर्पोरेट टीम" त्यांनी तयार केली आहे. ही "टीम" महेश लांडगे यांचे "बॅक ऑफीस" सांभाळणार आहे. एवढेच नव्हे तर "पैलवान" ही प्रतिमा बदलण्यासाठी आमदार स्वतःमध्येही बदल घडवत असून, नियमित व्यायाम आणि 'पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट'वरही भर दिला आहे.

### राजकारणातील मुत्सद्दी...
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लाटेत अपक्ष बाजी मारणारे महेश लांडगे शहरात चर्चेचा विषय ठरले आहेत. भोसरी विधानसभा मतदार संघातील तरुणाचे ते 'दादा' बनले आहेत. सर्वपक्षीय पदाधिका-यांना ऐन निवडणुकीत सोबत घेण्याची केलेली खेळी, अपक्ष असतानाही पक्षीय उमेदवारांना आस्मान दाखविल्याने त्यांचा मतदार संघामध्ये वेगळाच दबदबा आहे. मात्र, महेश लांडगे यांनी हे यश टिकवून ठेवण्यासाठी तसेच आगामी महापालिका निवडणुकीच्या रणांगणात आपल्या समर्थकांना उतरविण्यासाठी 'हायटेक' तयारी सुरु केली आहे.

### सर्वसामान्यांसाठी 'परिवर्तन'...
संगणकाच्या युगात सर्वसामान्य नागरिकांना आपल्या दैनंदिन समस्या तात्काळ सोडविता याव्यात. नागरी समस्यांबाबत नागरिकांच्या मनामध्ये लोकप्रतिनिधींबाबत उदासीनतेची भावना असते. मात्र, भोसरी परिसरातील नागरिकांना आपल्या समस्या तात्काळ सोडविता याव्यात यासाठी आमदार महेश लांडगे यांनी 'परिवर्तन' हेल्पलाइन सुरु केली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांना आपल्या समस्या सोडविण्यास मदत होत असून, प्रशासकीय अधिका-यांनाही काम करण्यास सोपे झाले आहे.

### नागरिकांच्या अपेक्षापूर्तीचे 'व्हिजन'...
भोसरी मतदार संघामध्ये बदल घडवून आणण्याचे अभिवचन महेश लांडगे यांनी मतदारांना दिले होते. त्यानुसार, ते आता कामाला लागले आहेत. त्याचा पहिला टप्पा म्हणून महेश दादा व्हिजन ॲकेडमीची स्थापन केली आहे. शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, मतदार संघातील विविध प्रश्न सोडविणे, महिला व युवकांचे संघटन, त्यांच्यासाठी रोजगार उपलब्ध करुन देणे, विविध अभिनव योजना राबविणे आदी काम ही "टीम" करणार आहे. महेश लांडगे यांना कायम प्रसिध्दी झोतात राखण्याचे कामही ही "टीम" करणार आहे.



श्री. धनंजय वर्णेकर,
उद्योजक, पिंपरी- चिंचवड.

### विकासकामांसाठी सल्लागार यंत्रणा..
एखाद्या कार्पोरेट लोकप्रतिनिधीप्रमाणे आमदार लांडगे यांनी निवृत्त प्रशासकीय अधिकारी, विधानभवन, मंत्रालयात काम केलेले माजी अधिकारी, महिला संघटक, सल्लागार अशा २७ जणांची 'टीम' तयार केली आहे. त्यामध्ये भोसरी मतदार संघातील प्रत्येक प्रभागामध्ये स्वतंत्र कार्यालय सुरु करण्याची योजना आहे. आठवड्यातील एक दिवस या कार्यालयासाठी आमदार देणार आहेत. त्यामुळे संबंधित प्रभागातील नागरिकांना त्यांच्या शितलबाग येथील कार्यालयात जाण्यासाठी वेळ खर्ची करावा लागणार नाही.

### प्रतिमा बदलण्यासाठी प्रयत्न...
एकीकडे लोकाभिमुख होण्याचा प्रयत्न आमदार लांडगे करत असतानाच दुसरीकडे ते आपली "रांगडा गडी" ही प्रतिमा बदलण्यासाठी स्वतःमध्येही मोठ्या प्रमाणावर बदल घडवत आहेत. अलिकडच्या काळात आमदार लांडगे यांच्या वागण्या-बोलण्याबरोबरच त्यांच्या वेशभूषेतही बदल झाला आहे. त्यांनी साहित्य वाचन वाढविले आहे. "फिटनेस"साठी नियमित व्यायामावर आमदारांनी भर दिला आहे. त्यामुळे एक कार्पोरेट आमदार म्हणून त्यांची ओळख निर्माण होवू लागली आहे.

### नागरिकांचा जपण्यासाठी धडपड...
भोसरी विधानसभा मतदार संघातील अन्य प्रमुख उमेदवारांना सुमारे नव्वद हजार मतदान झाले होते. त्यामुळे या मतदारांनी आपल्यास का पसंती दिली नाही? मतदारांच्या आपल्याकडून काय अपेक्षा आहेत? याचा अभ्यासही आमदार महेश लांडगे यांनी सुरु केली आहे. त्यामुळे आगामी काळात लोकांना जपण्यासाठी त्यांनी पूर्ण ताकद लावली असून, आपल्या कार्यकर्त्यांनाही लोकांच्या अपेक्षांना खरे उतरण्याची ताकीद दिली आहे. परिणामी, लोकनेता म्हणून आमदार महेश लांडगे आगामी काळात ओळखले जातील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.